


**कोल्हापूर :** कमला कॉलेज येथे उच्च शिक्षणाचा दर्जा वाढवण्यात विद्यार्थ्यांचा सहभाग या विषयाच्या चर्चासत्राचे उद्घाटन करताना नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, शेजारी रा.कृ. कणबरकर, रेखा पंडित, कुलगुरु डॉ.माणिकराव सांळुखे, प्राचार्य. क्रांतिकुमार पाटील.

# उच्चशिक्षणाला उद्योजकांच्या विचारांची जोड गरजेची

## कुलगुरू डॉ. पठाण यांचे मत

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : उच्च शिक्षणाला उद्योजक आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या विचारांची जोड गरजेची आहे, असे मत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण यांनी व्यक्त केले.

'उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यात विद्यार्थ्यांचा सहभाग' विषयावर कमला महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. रा. कृ. कणबरकर होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले.

डॉ. पठाण म्हणाले, "राज्यात ४० लाख सुशिक्षित बेरोजगार आहेत. त्यामुळे उच्चशिक्षण पद्धतीचा आढावा घेणे गरजेचे बनले आहे. परंपरागत व्यवस्था बदलण्याची गरज आहे. जागतिकीकरणाशी दोन हात करणारे विद्यार्थी घडविण्याची जबाबदारी असल्याने दर्जेदार उच्चशिक्षण महत्त्वाचे आहे. यासाठी स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. विद्यापीठ अनुदान आयोगही व्यावसायाभिमुख शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न करीत आहे.यासाठी शिक्षणपद्धती सतत बदलणारी ठेवणे आवश्यक आहे."

डॉ. साळुंखे म्हणाले, "विद्यार्थ्यांची शिक्षक व अभ्यासक्रमाबद्दलची मते जाणून घेणे गरजेचे आहे. यातून शिक्षणाचा दर्जा सुधारता येईल. शिक्षकांमध्ये सकारात्मक बदल होतील व ते बदल आपणास विद्यार्थ्यांमध्ये पाहता येतील."

श्री. साळुंखे यांनी शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या सहभागाने सुरू असलेल्या विविध योजनांची माहिती चित्रफितींद्वारे दिली.

डॉ. कणबरकर यांनी विद्यार्थी-शिक्षक हे नाते हरवत चालले असल्याची खंत व्यक्त केली. विषय केंद्रित ऐवजी व्यक्ती केंद्रित शिक्षण दिल्यास उच्चशिक्षणाचा दर्जा नक्कीच वाढेल, अशी आशा त्यांनी या वेळी व्यक्त केली. कमला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी स्वागत केले. प्रा. सौ. तेजस्विनी मुडेकर यांनी सूत्रसंचालन केले. चर्चासत्रास प्रायार्य डी. आर. कोण्णूर, प्राचार्य अशोक जगताप, प्राचार्य डी. आर. मोरे, प्राचार्य सी. आर. गोडसे उपस्थित होते. पहिल्या सत्रात डॉ. एम आर. कुरूप, डॉ. एच. व्ही. देशपांडे व प्राचार्य प्रवीण चौगुले यांनी प्रबंध सादर केले. दुसऱ्या सत्रात प्राचार्य सविता शेटे, प्राचार्य डॉ. एस. ए. देव, डॉ. के. व्ही. सुकरणकर, डॉ. सौ. वर्षा मेंदगी, प्रा. रेखा पंडित व प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रबंध सादर केले. डॉ. व्ही. एम. चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.